
- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संपादक : सुनील कुहीकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २७ जानेवारी २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ५८ | किंमत : २ रूपये

आज बाबा ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव

**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,२८,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,२६,३५० /-
- ✔ चांदी : १,७८,३००/-


**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
**- आजच संपर्क करा -**
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात मुक्त व्यापार करार





**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील मुक्त व्यापार करारासंदर्भात डील झाली आहे. या डीलला आता मदर ऑफ ऑल डील म्हटलं जात आहे. या संदर्भातील चर्चा २००७ मध्ये सुरु झाली होती. वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी म्हटलं की ऐतिहासिक कराराची घोषणा मंगळवारी होणार आहे. करारावर अंतिम स्वाक्षरी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर होतील.

**मदर ऑफ ऑल डीलची उद्या घोषणा**

सचिव राजेश अग्रवाल यांनी म्हटलं की कराराचा मसुदा आणि त्याचे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यात ५ ते ६ महिने लागणार आहेत. यानंतर दोन्ही पक्ष या करारावर अधिकृत हस्ताक्षर करतील. सरकारच्या अंदाजानुसार हा मुक्त व्यापार करार पुढील वर्षी लागू होईल. या करारामुळं भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील आर्थिक सहकार्य वाढेल. याचा मुख्य उद्देश द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण करत दोन्ही अर्थव्यवस्थांना जोडणं हा आहे. तज्ज्ञांच्या माहितीनुसार या डीलमुळं भारतीय निर्यातदारांना उद्योग आणि गुंतवणुकीसाठी यूरोपियन बाजारात पोहोचता येईल. युरोपियन कंपन्यांना वेगानं भारतात तेजीनं वाढणाऱ्या ग्राहक बाजारात प्रवेशाची संधी मिळेल. वाणिज्य सचिवांच्या माहितीनुसार हा करार अशा प्रकारे तयार करण्यात आला आहे.



**महाराष्ट्राच्या चित्ररथाने वेधले दिल्लीचे लक्ष...**

यामध्ये दोन्ही पक्षांचं हित समान पद्धतीनं लक्षात ठेवण्यात आलं आहे. दीर्घकालीन आर्थिक सहयोग मजबूत होईल आणि जागतिक पुरवठा साखळी, गुंतवणूक आणि व्यापाराची नवी समीकरण यात भारत आणि युरोपियन युनियन नवी यांच्यातील करार नवी दिशा देईल. तज्ज्ञांच्या मते मुक्त व्यापार करारामुळं दोन्ही बाजूंची रणनितीक भागिदारी मजबूत होईल. यामुळं भारताचं जागतिक व्यापर धोरणात महत्त्वाची भूमिका राहणार आहे. मुक्त व्यापार करारामुळं दोन्ही बाजू ९० टक्क्यांहून अधिक वस्तूंवरील आयात शुल्क रद्द करण्यावर सहमत झाल्या. याशिवाय टेलीकॉम, वाहतूक, अकाऊंटिंग आणि ऑडिटिंग सारख्या क्षेत्रात व्यापार अधिक सुलभ बनवण्याची तरतूद आहे. सध्या भारतातून निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आणि लेबर इन्सेटिव्ह सेक्टरवर १० टक्के आयात शुल्क युरोपियन युनियन आकारतं. साधारणपणे हे शुल्क ३.९ टक्के होतं. भारत युरोपियन युनियनच्या वस्तूंच्या आयातीवर ९.३ टक्के शुल्क आकारतं. यात सर्वाधिक शुल्क ३५.५ टक्के ऑटोमोबाइल्स आणि इतर पार्टसवर आकारलं जातं. प्लॅस्टिकवर १०.४ टक्के आणि रसायनांवर ९.९ टक्के आयात शुल्क आहे.

दरम्यान, भारतातून मोठ्या प्रमाणावर निर्यात युरोपियन युनियनला केली जाते. भारताच्या निर्यातीच्या एकूण १७ टक्के निर्यात ईयुला केली जाते.

**थोडक्यात**

## पुणे-नागपूर वंदे भारत चार तास ठप्प

**नागपूर :** अजनीहून पुण्याकडे जाणारी वंदे भारत एक्स्प्रेस दौंड मार्गावर श्रीगोंदा परिसरात तब्बल साडेचार तास एकाच ठिकाणी थांबवून ठेवण्यात आल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. दौंड-मनमाड रेल्वे मार्गावर आधीच जाहीर करण्यात आलेल्या मेगाब्लॉकची माहिती असूनही ही गाडी रद्द न करता मार्गावर सोडण्यात आल्याने रेल्वे प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेषतः वृद्ध, महिला आणि लहान मुलांना या विलंबाचा मोठा त्रास सहन करावा लागल्याची तीव्र प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली.

## सोन्याचा उच्चांक

**वृत्तसंस्था, मुंबई**

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे दर ५१०० डॉलर प्रति औंसवर पोहोचले आहेत. तज्ज्ञांच्या मते सोन्याच्या दरात तेजी राहण्याची अनेक कारणं आहेत. त्यामध्ये वाढता भूराजनैतिक संघर्ष, जगभरातील मध्यवर्ती बँकांकडून सुरु असेलली सोने खरेदी याचा समावेश आहे.

सोन्याचे दर २०२५ मध्ये ६४ टक्क्यांनी वाढले होते. २०२६ मध्ये सोन्याचे दर आतापर्यंत १७ टक्क्यांनी वाढले आहेत. लंडन बुलियन मार्केट असोसिएसनच्या वार्षिक सर्व्हेत तज्ज्ञांनी सोन्याचे दर या वर्षी ७१५० डॉलर प्रति औंसवर जातील असा अंदाज वर्तवला आहे. गोल्डमन सॅक्सनं डिसेंबर २०२६ साठी सोन्याचा संभाव्य दर ५४०० डॉलर प्रति औंस केला आहे. स्वतंत्र विश्लेषक रॉस नॉर्मन यांनी सोन्याचा दर सरासरी ५३७५ डॉलर प्रति औंस राहील असा अंदाज वर्तवला तर उच्चांक ६४०० डॉलर प्रति औंस असेल इतका अंजाच वर्तवला आहे. सोमवारी सोन्याचा दर १ लाख ५७ हजारांच्या पुढे टेकला होता.

## प्रजासत्ताक दिनी फुगे विकताना सिलेंडरचा स्फोट, ४ जखमी

**वृत्तसंस्था, नाशिक**

देशभरात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून गल्लीपासून दिल्लीपर्यंत देशभक्तीचा रंग चढल्याचे पाहायला मिळत आहे. खिशावर तिरंगा, तिरंगी सजावट करुन सर्वत्र उत्साहात ध्वजारोहन झाले. मात्र, नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये तिरंगी रंगाचे फुगे घेताना सिलेंडरचा स्फोट होऊन अपघात घडल्याची दुर्दैवी घटना घडली.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर फुगे घेण्यासाठी थांबलेल्या नागरिकांजवळ अचानक नायट्रोजन गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. त्यामध्ये, ४ जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. या दुर्घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत चौकशी सुरू केली आहे.

मालेगावातील कॉलेज बस स्टॉप येथे ही घटना घडली. या स्फोटात दोन लहान मुले, दोन महिला आणि एका पुरुषासह एकूण पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर स्थानिकांच्या मदतीने जखमींना तात्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे.

## कोलकातामध्ये गोदामाला भीषण आग, ७ जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था, कोलकाता**

पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील नाझिराबादमध्ये एका गोदामाला आग लागली. या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.अग्निशमन दलाकडून २ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. नातेवाईकांच्या माहितीनुसार २० जण बेपत्ता आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार दुपारी तीन वाजता ड्राय फूडच्या गोदामात आग लागली. अग्निशमन दलाच्या १५ गाड्या घटनास्थळी आग विझवण्यासाठी दाखल झाल्या आहेत.



अग्निशमन दलानं आगीवर थोड्या प्रमाणात नियंत्रण मिळवल्यानंतर गॅस कटर घेत इमारतीत गेले. आनंदपूरच्या नाझिराबादमधील गोदामात प्रामुख्यानं कोरड्या स्वरुपाची खाद्य पदार्थाची पॅकेटस आणि सॉफ्ट ड्रिंक्सच्या बाटल्या होत्या. अग्निशमन दलाच्या माहितीनुसार आग दोन गोदामांमध्ये पसरली. यामुळं सर्व काही जळून खाक झालं.

अग्निशमन दलाला या आगीसंदर्भात माहिती मिळाली होती. मात्र, गोदाम अरुंद रस्ता असणाऱ्या ठिकाणी असल्यानं अग्निशमन दलाच्या वाहनांना घटनास्थळापर्यंत पोहोचण्यास अडचणी निर्माण झाल्या यामुळं आगीवर नियंत्रण आणण्यात वेळ लागला.

पश्चिम बंगालचे ऊर्जा मंत्री अरुप विश्वास घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मृतांच्या नातेवाईकांचं सांत्वन केलं. याशिवाय त्यांच्याकडून बचाव कायार्चा आढावा घेण्यात आला. आगीच्या घटनेत ज्यांचे नातेवाईक बेपत्ता आहेत त्यांच्या नातेवाईकांसोबत अरुप विश्वास यांनी चर्चा केली. मंत्री अरुप विश्वास यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस आणि अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण आणण्याचं काम सुरु आहे. आगीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवण्यात आल्याची माहिती देत फायर फायटर्स इमारतीत दाखल झाल्याची माहिती त्यांनी दिली. अरुप विश्वास यांनी ही राजकारण करण्याची वेळ नाही, पोलीस आणि अग्निशमन दलाला त्यांचं काम करु देण्याची वेळ असल्याचं म्हटलं.

गोदामात आग कशामुळं लागली हे स्पष्ट झालेलं नाही. रात्रीच्या ड्युटीवर असणारे कर्मचारी आत अडकले होते. याशिवाय सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे सहा लोक देखील आत अडकल्याची माहिती आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार गोदाम बाहेरुन बंद होतं, त्यामुळं लोक आत जाऊ शकले नाहीत.

## भाषणात डॉ.आंबेडकरांचे नाव न घेतल्याने गिरीश महाजनांवर महिला कर्मचाऱ्याचा रोष

**कार्यक्रमस्थळी भाषणानंतर घातला गोंधळ, मातीचे काम दिले तरी मी करेन. पण बाबासाहेबांची ओळख पुसली जाऊ देणार नाही : महिला कर्मचारी**



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक पोलीस परेड मैदान येथे शासकीय ध्वजवंदन सोहळा झाला. मंत्री गिरीश महाजन यांनी कुंभमेळ्यानिमित्त नाशिक जिल्ह्यात होत असलेल्या विकास कामांची माहिती दिली. मंत्री महाजन यांच्या भाषणावेळी एक वेगळाच प्रकार घडला. मंत्री गिरीश महाजन भाषण करत असताना त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याचा आरोप करीत एक महिला कर्मचारी संतप्त झाली. या महिला कर्मचाऱ्याने महाजन यांना जाब विचारला. या घटनेमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. गिरीश महाजन यांना जाब विचारणारी महिला कर्मचारी वन विभागात कार्यरत असल्याचे समजते. दरम्यान, या प्रकरणावरून गिरीश महाजन यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

**वृत्तसंस्था, नाशिक**

मला वाळूच्या गाड्या उतरवायला लावल्या, मातीचे काम दिले तरी मी करेन. पण बाबासाहेबांची ओळख पुसली जाऊ देणार नाही. त्यांनी आपली चूक स्वीकारावी. बाबासाहेबांचं नाव मंत्री आता तरी भाषणात घेतील, मग घेतील. याची मी वाट पाहत होते. पण बाबासाहेबांचं नाव भाषणात आलं नाही. लोकशाही आणि संविधानाला कारणीभूत



नसलेल्या लोकांची नावं वारंवार घेण्यात आली. मग संविधानाचा आणि प्रजासत्ताक दिनाचा जो खरा मानकरी आहे, त्याचं नाव भाषणात का नाही?, असा प्रश्न नाशिक येथील मुख्य प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात एका महिला कर्मचाऱ्याने थेट मंत्री गिरीश महाजन यांना करण्याची हिंमत दाखवली.

## ध्वजारोहन सुरू असतांना दारूबंदी अधिकारी व शिक्षकाचा ह्रदयविकाराने मृत्यू

**वृत्तसंस्था, महाराष्ट्र**

देशभरात आज प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यनं देशभक्तीचा मोठा उत्साह बघायला मिळत आहे. असे असताना धाराशिवतील उमरगा तालुक्यातील तलमोड येथे एक दुदैवी घटना घडली आहे. प्रजासत्ताक दिनाची तयारी करत असताना दारूबंदी अधिकाऱ्याला अचानक मृत्यूने गाठलंय. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच दारूबंदी अधिकाऱ्याचा हार्ट अटॅकने मृत्यू झालाय. उमरगा तालुक्यातील तलमोड येथील दारूबंदी अधिकारी मोहन जाधव (वय वर्ष ५५) यांचा झेंडावंदन करताना हार्ट अटॅकने मृत्यू झालाय. ते उमरगा





तालुक्यातील तलमोड सीमा तपासणी नाक्यावर कार्यरत होते. तर ते मूळचे सोलापूरचे रहिवासी होते.

आज प्रजासत्ताक दिनी कर्तव्यावर असताना काळानं झडप घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

तसेच बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील मोहेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ध्वजवंदनाची तयारी करत असतानाच मुख्याध्यापक दिलीप राठोड यांचा ह्दयविकाराच्या धक्क्याने शाळेच्या प्रांगणातच कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला. ध्वजवंदनाची तयारी सुरू असतानाच अचानक मुख्याध्यापक दिलीप राठोड यांना चक्कर येऊन ते खाली कोसळले. उपस्थितांनी त्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात हलवले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

## पालकमंत्र्यांच्यांकडून सत्यनारायण नुवाल यांचे अभिनंदन!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** सोलार ग्रुपचे संस्थापक सत्यनारायण नुवाल यांना यंदाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सत्यनारायण नूवाल यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या विविध कार्याबद्दल माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, लिलादेवी नुवाल, मनीष नुवाल, राघव नुवाल आदी उपस्थित होते.

## नक्षल्यांच्या गडात पहिल्यांदाच फडकला तिरंगा

**बिनागुंडात पहिल्यांदाच ध्वजारोहन, पोलीस चौकीही उभारली**

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

देशभरात आज प्रजासत्ताक दिनाचा उत्साह पाहायला मिळाला. गाव, शाळा ते राजधानी दिल्लीपर्यंत सर्वांनीच तिरंग्याला सलामी देत प्रजासत्ताक दिन साजरा केला.

देशभरात गेल्या ७७ वर्षांपासून प्रजासत्ताक दिन साजरा होत असून २६ जानेवारी १९५० पासून देशात संविधान लागू करण्यात आले, म्हणजे जनतेचं राज्य देशात आलं. मात्र, गडचिरोलीत एका भागात पहिल्यांदाच तिरंगा फडकला.

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील अतिदुर्गम बिनागुंडा परिसराला एकेकाळी नक्षलवाद्यांचा



बालेकिल्ला मानला जायचा. याच नक्षल्यांच्या बालेकिल्ल्यात आज पहिल्यांदाच ध्वजारोहण झाले.

गडचिरोली पोलीस दलाने दोन दिवसांपूर्वीच येथे नव्या पोलीस ठाण्याची उभारणी केली आणि आज प्रजासत्ताक दिनी माओवाद्यांच्या गडात पहिल्यांदाच तिरंगा फडकवत गणतंत्र दिनाचा उत्सव दिमाखात साजरा झाला.

गडचिरोली पोलीस दलाने दोन दिवसांपूर्वीच येथे नव्या पोलीस ठाण्याची उभारणी केली आणि आज प्रजासत्ताक दिनी माओवाद्यांच्या गडात पहिल्यांदाच तिरंगा फडकवत गणतंत्र दिनाचा उत्सव दिमाखात साजरा झाला.

गडचिरोली पोलिसांनी सीमेवरील कवंडे, तूमरकोटी, फुलणार, बिनागुंडा या ठिकाणी प्रथमच राष्ट्रध्वज फडकवला.

बिनागुंडा येथे गावालगतच माओवाद्यांचे एक स्मारक त्यांच्या अस्तित्वाचे आणि दहशतीचे प्रतीक उभे होते. पोलिसांनी ते स्मारक पूर्णपणे नष्ट करून मानसिक दहशत मोडून काढली.

दरम्यान, आज ध्वजारोहन करताना शाळेतील मुलांसोबत आनंद व उत्साही सेलीब्रेशन केलं, यावेळी शाळकरी मुलांनीही आपलं भाषण केलं.

संपादकीय लेखणीतून...

## माधव जूलियन: छंदोरचना ग्रंथकार

कवी माधव जूलियन यांचा जन्म दि.२१ जानेवारी १८९४ रोजी त्यांचे थोरले मामा महादेव विश्वनाथ सहस्त्रबुद्धे यांच्या घरी, बडोद्याला झाला. आरंभीची आठ-नऊ वर्षे ही गुजरातमधील बडोदा, भडोच, पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यातील आवळस येथे गेली. १९०४साली ते आवळसहून बडोद्याला आले. तेथेच त्यांचे बहुतेक शालेय शिक्षण व पुढे महाविद्यालयीन शिक्षण झाले. बडोद्यातील त्यांचे वास्तव्य त्यांच्या व्यक्तिगत व वाङ्मयीन जीवनाच्या घडणीत विशेष महत्त्वाचे आहे. त्यांच्या सुधारकी विचारांमुळे ते मामांच्या घरातून बाहेर पडून स्वतंत्रपणे राहू लागले. याच काळात त्यांच्याभोवती रा.वि.मराठे, विठ्ठलराव घाटे, शांता हेर्लेकर प्रभृतींचे काव्यप्रेमी मित्रमंडळ जमा झाले. राजकवी चंद्रशेखर यांच्याशीही त्यांचा निकटचा संबंध आला. इथेच त्यांच्या माधव नावाला जूलियन या नावाची जोड मिळून ते माधव जूलियन झाले. मारी कौरेलीच्या ह्यॠवी ॠव चरप या कादंबरीत ह्यजूलियन अ‍ॅडाले हे एक पात्र आहे. तो स्वच्छंदी, बड्या दांभिकांचे दंभ उघड करणारा, रोमॅन्टिक कवी आहे. माधवरावांची मैत्रीण शांता हेर्लेकर यांनी माधवरावांना सांगितले की, तुम्ही त्या जूलियन अ‍ॅडालेसारखे आहात. त्यातील जूलियन हे नाव आपल्या माधव नावाला जोडून ते माधव जूलियन झाले. त्याच टोपणनावाने ते कविता लिहू लागले.

सन १९१६साली ते फारसी विषय घेऊन बी.ए.झाले व १९१८साली फारसी-इंग्रजी घेऊन ते एम.ए.झाले, आणि पुण्याला डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्गसन महाविद्यालयात फारसी व इंग्रजी या विषयांचे प्राध्यापक झाले. इथेच त्यांचा सर्व तऱ्हेच्या नवतेचा उत्साहाने पुरस्कार करणाऱ्या श्री.बा.रानडे यांच्याशी स्नेह जमला. यातूनच आधुनिकतेचा जीवनात व साहित्यात हिरिरीने पुरस्कार करणाऱ्या रविकिरण मंडळाची स्थापना झाली (९सप्टेंबर १९२३). या वातावरणात, मित्रांच्या सहवासात माधवरावांचे कवित्व बहरले; त्यांना प्रतिष्ठा, मान्यता मिळत गेली.

अशा चढतीच्या काळातच त्यांच्यावर मोठा आघात झाला. डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील काही विरोधकांच्या कटकारस्थानांनी माधवरावांना प्रथम दोन वर्षे निर्वेतन रजेवर जावे लागले, आणि नंतर सोसायटीचा राजीनामा द्यावा लागला (१९२५). या मधल्या दोन वर्षांत माधवरावांनी अंमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली (१९२४ ते १९२६). तेथून सुटल्यावर १९२६ ते १९२८ या दोन वर्षांत त्यांनी पुण्याच्या भावे स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली. त्यानंतर १९२८सालापासून अखेरपर्यंत (१९३९) त्यांनी कोल्हापूरला राजाराम कॉलेजात फारसी व इंग्रजी विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले. राजाराम कॉलेजात रुजू होण्यापूर्वी त्यांनी गंगूताई गरुड (विवाहानंतर लीलाबाई पटवर्धन) यांच्याशी लग्न केले (२९मे १९२८). यापुढे लौकिकार्थाने त्यांच्या जीवनास स्थैर्य आले. १९३६साली जळगावला भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. फेब्रुवारी १९३९ मध्ये त्यांना छंदोरचना या बृहत ग्रंथासाठी मुंबई विद्यापीठाची सर्वोच्च अशी डी.लिट.पदवी मिळाली. असे चढतेवाढते यश मिळत असतानाच, पुण्यात नव्यानेच बांधलेल्या (१९३६) आपल्या निवान्त या बंगल्यात, अवघ्या शेहेचाळिसाव्या वर्षी २९नोव्हेंबर १९३९ या दिवशी या अशांत आत्म्याला चिरशांती मिळाली.

मराठी साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात माधवरावांनी मोलाचे वाङ्मयीन कार्य केले असले, तरी त्यांची पहिली, मुख्य ओळख कवी- माधव जूलियन म्हणूनच आहे. काव्यक्षेत्रात माधवरावांचे कार्य चतुर्विध आहे. त्यांनी प्रत्यक्ष स्फुट, दीर्घ काव्यरचना केली; उमरखय्यामच्या रुबायांचे तीन वेळा, तीन प्रकारांनी भाषांतर केले; काव्यविचार केला, काव्यसमीक्षा केली; आणि पद्यरचनाशास्त्रावर छंदोरचना हा बृहत ग्रंथ निर्माण केला. त्यांचे स्फुट काव्याचे संग्रहः गज्जलांजलि (१९३३, १०८ गज्जल); स्वप्नरंजन (१९३४, ११३ स्फुट भावकविता); आणि मधुलहरी व इतर कविता (प्रकाशन माधवरावांच्या निधनोत्तर-१९४०, २६ स्फुट भावकविता). यांखेरीज तुटलेले दुवे हा सुनीतसंग्रह अथवा सुनीतमाला (१९३८, १०१ सुनीते). गज्जलांजलिमध्ये सामान्यतः फारसी वृत्तांमधील गज्जलांचा संग्रह आहे. प्रस्तुत पद्यसंग्रह हा एक हौसेचा प्रयोग आहे. (माधव जूलियन, प्रस्तावना). यातील बहुसंख्य गज्जला या प्रेमविषयक आहेत. फारसीतील गज्जल हा पद्यप्रकार त्यांनी मराठीत आणला; अनेक फारसी वृत्ते मराठीत आणली; पुढील कवींना अभिव्यक्तीसाठी अनेक पद्यरचनाबंध उपलब्ध करून दिले. माधवरावांनी फारसी गज्जलांची वृत्ते वापरली; पण फारसी गज्जलांतील अनेक शेरांची साखळी असे त्यांचे स्वरूप न ठेवता, त्या स्वतंत्र-स्वयंपूर्ण मराठी भावकविता केल्या. स्वप्नरंजन हा त्यांच्या भावकवितांचा दुसरा, महत्त्वाचा संग्रह. याच्या प्रस्तावनेत माधव जूलियनांनी लिहिले आहे, आत्मरचनेसाठी आरंभ केला, तरी काव्याची समाप्ती ही रसिकरंजनासाठीच असते. या कवितांतून माधव जूलियनांच्या भावजीवनाची सलग प्रतीती येते. यांतल्या बऱ्याच कविता ह्या आत्मभावजीवनाचा आविष्कार करणाऱ्या आहेत.

# 'मदर ऑफ ऑल डील्स' सर्व करारांची जननी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

यावेळी, प्रजासत्ताक दिनाच्या दुसऱ्या दिवशी, २७ जानेवारी हा दिवस ऐतिहासिक ठरू शकतो. भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार करार होऊ शकतो. युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उसुर्ला वॉन डेर लेयन यांनी याचे स्पष्ट संकेत दिले आहेत आणि त्याला "सर्व करारांची जननी" म्हटले आहे.

जगातील अनेक देश भारतासोबत व्यापार करण्यासाठी आकर्षित होत आहेत. अलिकडेच, युएईच्या अध्यक्षांनी भारतासोबत संरक्षण करार करून पाकिस्तानला मोठा धक्का दिला. दरम्यान, ट्रम्पवर नाराज असलेले युरोपियन युनियन भारताकडे वळले आहे. युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी भारतासोबतच्या कराराबद्दल एक मोठी घोषणा केली आहे. त्यांच्या भारत भेटीपूर्वी, त्यांनी ट्रम्प यांना 'सर्व करारांची जननी' असे संबोधून त्यांना चकित केले.

ग्रीनलँड मुद्द्यावरून ट्रम्प यांनी केवळ युरोपीय देशांनाच नाराज केले नाही तर अमेरिकेतील सर्वात मोठ्या गुंतवणूकदारांनाही दूर केले आहे. ट्रम्पच्या मूर्खपणानंतर, युरोपीय देशांनी भारतावर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. येणारे आठवडे भारतासाठी महत्त्वाचे असतील. अलिकडेच, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी भारतासोबत होणाऱ्या करारांबाबत एक मोठी घोषणा केली. त्यांनी "मदर ऑफ ऑल डील्स" चा ट्रेलर देखील शेअर केला आणि त्यांच्या भारत भेटीची घोषणा केली.

दावोसमध्ये जगातील आर्थिक शक्ती एकत्र येत असताना, भारत आणि युरोपमधील कराराच्या बातमीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हा केवळ कोणताही सामान्य व्यापार करार नाही, तर त्याला "सर्व करारांची जननी" म्हटले जात आहे. हा महत्त्वाचा करार अशा वेळी झाला आहे जेव्हा भारताची अर्थव्यवस्था आव्हानांना तोंड देत आहे आणि जागतिक बाजारपेठा अस्थिर आहेत. आता प्रश्न असा आहे की या करारामुळे दोन्ही खंडांमध्ये कोणते बदल घडू शकतात आणि ते नेमके काय आहे?

१.४७ अब्जाहून अधिक लोकसंख्या असलेला भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाचा अर्थव्यवस्था आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेचा अंदाज आहे की २०२६-२७ मध्ये भारताची अर्थव्यवस्था सर्वात वेगाने वाढणारी असेल, ज्याचा विकास दर सुमारे ६.५ टक्के असेल. IMF च्या माजी उपव्यवस्थापकीय संचालक गीता गोपीनाथ यांचा अंदाज आहे की भारत २०२८ पर्यंत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू शकेल. अशा देशासोबत व्यापार करार केल्याने युरोपियन देशांना व्यापक आणि वैविध्यपूर्ण बाजारपेठ मिळेल. २७ देशांचा संघ असलेला युरोपियन युनियन, ज्याचा जीडीपी $२२.५ ट्रिलियन, लोकसंख्या सुमारे ४६० दशलक्ष आणि सरासरी दरडोई उत्पन्न सुमारे $४९,००० आहे, तो भारताचा युरोपियन युनियनसोबतचा मुक्त व्यापार करार निःसंशयपणे संपूर्ण जगाला एक धक्कादायक संदेश देईल. १.९३ अब्ज लोकसंख्येसाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा ठरेल. नवीन व्यापार मार्ग उघडतील, उत्पादनांची मागणी वाढेल, उत्पादन वाढेल आणि परिणामी, नवीन रोजगार निर्माण होतील. हे लक्षात घेण्यासारखे आहे की दोन्ही देशांमधील व्यापार वाटाघाटीच्या अनेक फेऱ्या १९ वर्षे चालू राहिल्या. त्यानंतर त्याला ब्रॉड-बेस्ड ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट ॲग्रीमेंट असे नाव देण्यात आले, परंतु २००७ ते २०१३ दरम्यान अनेक फेऱ्या झालेल्या वाटाघाटी असूनही, व्यापार करार होऊ शकला नाही. बाजारपेठेत प्रवेश, कर, बौद्धिक हक्क आणि मालमत्ता, कामगार कायदे आणि नियम आणि पर्यावरणीय मानके यासारख्या मुद्द्यांवर युरोपियन युनियनमध्ये मतभेद होते.

भारतीय उद्योगांना या कराराचा सर्वाधिक फायदा होईल. युरोपीय बाजारपेठ उघडल्याने कापड, पादत्राणे, रत्ने आणि दागिन्यांच्या निर्यातीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. यामुळे भारतीय उद्योगांना केवळ एक नवीन दिशा मिळणार नाही तर लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधीही वाढतील असे तज्ञांचे मत आहे. या करारामुळे भारताचे संरक्षण क्षेत्र, तांत्रिक उत्पादन आणि सेवा नवीन उंचीवर पोहोचू शकतात असे तज्ज्ञांचे मत आहे.

या कराराचा परिणाम भारत आणि युरोपपुरता मर्यादित राहणार नाही. ग्रीनलँड संकट आणि अमेरिकन बाजारपेठेतील इतर अस्थिरतेच्या दरम्यान, हा करार भारत आणि युरोपला स्थिर आर्थिक भागीदार म्हणून सादर करतो. याव्यतिरिक्त, जागतिक व्यापार, पुरवठा साखळी आणि गुंतवणूक निर्णयांच्या दिशेने त्याचा परिणाम होईल. हे गुंतवणूकदारांना सूचित करते की भारत आणि युरोप व्यापार आणि आर्थिक सुरक्षेसाठी एक नवीन रणनीती आखत आहेत.

दावोस येथील जागतिक आर्थिक मंचादरम्यान, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उसुर्ला वॉन डेर लेयन यांनी ऐतिहासिक घोषणा केली की भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील एक मोठा मुक्त व्यापार करार अंतिम टप्प्यात आहे. याला सर्व करारांची जननी म्हटले जात आहे आणि प्रजासत्ताक दिनाच्या दुसऱ्या दिवशी, २७ जानेवारी रोजी त्यावर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. हा करार केवळ व्यापारापुरता मर्यादित नाही, तर धोरणात्मक सहकार्य आणि जागतिक आर्थिक संतुलनाच्या दृष्टीने दोन्ही बाजूंसाठी महत्त्वाचा आहे.

हा केवळ कागदी करार नाही तर एक "मेगा-शील्ड" आहे जो भारत आणि युरोपच्या २ अब्ज लोकांना जोडेल. हा करार जगाच्या जीडीपीच्या अंदाजे २५% (एक चतुर्थांश) असेल. उसुर्ला वॉन डेर लेयन पुढील आठवड्यात भारताला भेट देत आहेत आणि ही सामान्य भेट नाही. त्या आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा २६ जानेवारी २०२६ रोजी भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात "प्रमुख पाहुणे" असतील. असे मानले जाते की या मेगा-कराराची अंतिम घोषणा २७ जानेवारी रोजी भारत-ईयू शिखर परिषदेत केली जाऊ शकते.

- ९५६१५९४३०६

## संत ताजुद्दीन बाबांची महिमा अपरंपार!

संत ताजुद्दीन बाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक मानल्या जाते.कारण संपूर्ण धर्माचे लोक बाबांच्या दर्शनासाठी येतात. भारत ही संतांची भूमी आहे. ही बाब संपूर्ण जग जाणतो. कारण या भुमित संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, संत नामदेव, संत ताजुद्दीन बाबा, संत गजानन महाराज, संत साईबाबा इत्यादी अनेक संतांचा जन्म महाराष्ट्रात झालेला आहे. त्यामुळेच महाराष्ट्राला संतांची भूमीचा दर्जा मिळाला आहे.

भारत भुमित कोणत्या-ना-कोणत्या रूपाने प्रत्येक धर्मात संत या भुमित जन्म घेत असतात व सर्वच धर्माच्या संस्कृतीचे जतन होत असते. आज संपूर्ण जग जाणते की भारत हे शांततेचे प्रतिक आहे.याचे मुख्य कारण म्हणजे या भुमित अनेक धर्म जन्माला आलेत त्यामुळेच अनेक संस्कृती दिसून येतात आणि मुख्यत्वे करून एकोप्याने राहतात हाच संत भुमिचा खरा गोडवा आहे. नागपूरातील संत ताजुद्दीन बाबा यांची अपार महिमा आपल्याला पहायला मिळते आणि जगजाहीर आहे. ताजुद्दीन बाबांचा जन्म २७ जानेवारी १८६१ ला नागपूर शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या कामठी या गावी

रमेश लांजेवार
नागपूर

झाला. बाबा एकवर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचा देहान्त झाला. यानंतर त्यांच्या ९ वर्षाच्या वयातच आईचा सुध्दा स्वर्गवास झाला. यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजीने करून त्यांना लहाण्याचे मोठे केले.ताजुद्दीन कामठीतील मदरशांमध्ये शिकत होते. कामठीतील मदरशांमध्ये अचानक हजरत अब्दुल्ला शाह नावाचे फकीर आले आणि त्यांची नजर (बालक) बाबा ताजुद्दीनवर पडली. त्यावेळेस त्या फकीराने शिक्षकाला विचारले "तुम इनको क्या पढाते हो" शिक्षक स्तब्ध झाले आणि फकीरच म्हणाले यह बालक (बाबा ताजुद्दीन) जन्मसेही सब कुछ सीखकर आया है.

इतके बोलुन फकीर तेथुन निघुन गेले. ताजुद्दीन बाबांना त्यांच्या मामांनी १८८१ मध्ये म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी नागपूरची रेजीमेंट नं. १३ मध्ये भर्ती केले. तीन वर्षांनंतर त्यांना मद्रासमधील सागरला पाठविण्यात आले. मद्रासी पलटनमध्ये अचानक विराण जागेवर संत हजरत दाऊद यांच्याशी भेट झाली आणि संपूर्ण रात्र सोबत भजन-कव्वालीमध्ये तल्लीन झाले. ताजुद्दीन बाबा स्वतः देवांच्या आठवणीत डुबुन रहायचे. असे सांगितले जाते की बाबांची ड्युटी "शस्त्रभंडार" देखभाल करण्यावर होती. बाबा आपला पहारा चोख देत होते, अशावेळी रात्री २ वाजता अचानक इंग्रज कैप्टन त्या जागेची पाहणी करायला आला. पाहणी झाल्यानंतर कैप्टन वापस जायला लागला. काही अंतरावर जात नाही तर त्याला जो शिपाई पहारा (ताजुद्दीन) देत होता तोच शिपाई पुन्हा दिसला.



कैप्टनला राग आला. पुन्हा वापस पहिल्या जागेवर गेला तर तीथे पहाले तर तो शिपाई (ताजुद्दीन)आपल्या जागेवरच होता.यानंतर इंग्रज ऑफिसरने बाबांना पेशीसाठी बोलावले व विचारले की आम्ही तुम्हाला दोन-दोन ठीकाणी पहाले.

तुम्ही देवाचे अवतार आहात का? यावर बाबांना घुस्सा आला. परंतु इंग्रज समजले हा शिपाई साधारण व्यक्ती नसून संत महात्मा आहे.हा त्यांचा पहिला चमत्कार दिसून आला. कालांतराने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. बाबांची वेगवेगळी हरकते पाहून त्यांच्या आजीने ताजुद्दीनला पुन्हा कामठीला आणले व अनेक डॉक्टरांना दाखविले. परंतु त्यांनी आत्मा व परमात्माची एकरूपता अवगत केल्याचे दिसून आले. काही लोक त्यांना पागल समजायला लागले. परंतु हळूहळू त्यांच्या हातुन अनेक चमत्कार दिसायला लागले. पीडीत लोक आपले दुःख-वेदना बाबांना सांगायला लागले व त्यांच्या नेत्रदृष्टीने बरेही व्हायला लागले. बाबांचे चमत्कार दुर-दुर पर्यंत पसरायला लागले. परंतु काही लोक आपल्या चमत्काराचा चुकीचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले. तेव्हा त्यांनी पागल असल्याचे सोंग करने सुरू केले व लोक त्यांच्या हरकतींना त्रासुन पोलिस कंप्लेंट केली व २६ ऑगस्ट १८९२ ला कामठीच्या कैन्टोनमेन्ट व जिल्हा मॅजेस्टेटने पागलखान्यात पाठविले. पागलखाण्यात लॉकपहध्ये बंद केल्यानंतरही लोकांना बाबा नागपूरच्या अनेक भागात दिसत होते.

हा चमत्कार सर्वच मोठ-मोठ्या ऑफिसरच्या लक्षात आला. असे अनेक चमत्कार लोकांना दिसायला लागले व बाबा ताजुद्दीन संत झाले. २१ सप्टेंबर १९०८ ला नागपूरचे महाराजा श्रीमंत राजा बहादुर राधोजीराव भोसले यांच्या प्रयत्नाने बाबांना पागलखान्यातून मुक्त केले राजाने आपल्या महालात आणले व राजांनी ताजुद्दीन बाबांची सेवा केली. संत ताजुद्दीन बाबा हिंदू-मुस्लिमांचे प्रेरणादायी प्रतिक होते.बाबांची तब्बेत काही दिवसांत खालावली व १७ ऑगस्ट १९२५ ला श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे नाम समाधी म्हणून सक्करदरा येथील श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची समाधी बांधण्यात आली यालाच "लहान ताजबाग" म्हणतात. इथे हिंदू प्रथेनुसार मोठ्या प्रमाणात आजही पुजा-अर्चना केली जाते व अंतिम संस्कार लहान ताजबागपासुन एक किलोमीटर अंतरावर असलेल्या ताजबाग येथे करण्यात आला याला "मोठा ताजबाग" म्हणतात.

इथे मुस्लिम पध्दतीने पुजाअर्चना केली जाते. याप्रमाणे "मोठा ताजबाग व लहान ताजबाग" हे दोन्ही पवित्र स्थान भारतभर प्रसिद्ध आहे या ठिकाणी दोन्ही धर्माचे लोक एकत्र येतात ही नागपूरसाठी गौरवास्पद बाब आहे. संत ताजुद्दीन बाबांनी आपले पाय ज्या-ज्या ठिकाणी रोवले त्या-त्या ठिकाणी दर्गा आपल्याला पहायला मिळते व बाबांचे दर्शन होते. बाबाचे अनेक प्रसिद्ध ठिकाण आहेत यात मोठा ताजबाग, लहान ताजबाग, वाकी, पागलखाना हे प्रसिद्ध ठिकाण आजही प्रसिद्ध आहे. बाबाच्या जयंती निमित्त शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येते. त्यामुळे संपूर्ण भक्तांना विनंती आहे की, वाढते हवामानातील बदल व प्रदुषणाचा धोका पहाता बाबांच्या जयंतीच्या निमित्ताने आपापल्या पद्धतीने संपूर्ण धर्माच्या भक्तांनी वृक्षारोपण करावे.

यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळेल व ऑक्सिजनची मात्रा वाढेल यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. अशा पध्दतीने वृक्षलागवड झाली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल व ही आठवण मनुष्याच्या हृदयात अनंत काळपर्यंत राहील. कारण बाबांचा सहवास नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचा त्यामुळे वृक्षलागवड अती आवश्यक आहे. संत ताजुद्दीन बाबांना कोटी कोटी प्रणाम.

- ९९२१६९०७७९

## प्रजासत्ताक दिन : अधिकारापासून कर्तव्यापर्यंत...

डॉ. राजेंद्र टेकाडे
काटोल, जि. नागपूर

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवशाली दिवस आहे. हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. मात्र या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजवंदन, संचलन किंवा औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःचे संविधान लागू झाले आणि भारत एक सार्वभौम, लोकशाही भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला आणि भारतीय समाजाच्या वास्तव परिस्थितीचा विचार करून संविधानाची रचना केली. त्यांच्या दृष्टीने संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संग्रह नव्हता, तर तो समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीचा मार्ग होता. शोषित, वंचित, दलित, स्त्रिया आणि अल्पसंख्याक यांना सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्यांनी संविधानात सामाजिक न्यायाची ठोस मांडणी केली.भारतीय संविधानामुळे नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले.

समानतेचा अधिकाराने जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नाकारला. स्वातंत्र्याच्या अधिकाराने अभिव्यक्ती, विचार, संघटन आणि व्यवसाय स्वातंत्र्य दिले. धार्मिक स्वातंत्र्याने प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार दिला. शोषणाविरुद्धच्या अधिकाराने मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण केले. हे अधिकार भारतीय नागरिकाला केवळ स्वतंत्र नाही तर सशक्त बनवतात.

आपण सर्व भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये दृढपणे रुजणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. भारतीय संविधानाने जात, पंथ, धर्म, लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव मान्य केलेला नाही. मात्र दुर्दैवाने आजही ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातसुद्धा अनेक ठिकाणी सामाजिक भेदभावाचे प्रकार दिसून येतात. हे प्रकार संविधानाच्या मूल्यांना आणि भारतीय लोकशाहीच्या आत्म्याला छेद देणारे आहेत. समानतेचा अधिकार कागदावर मर्यादित न राहता तो आपल्या वागण्यात उतरला पाहिजे. जातीधर्माच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून माणसाशी वागणे, हीच खरी संविधाननिष्ठा आहे. जोपर्यंत आपण भारतीय म्हणून एकत्र येत नाही, तोपर्यंत संविधानाने अपेक्षित केलेला समताधिष्ठित समाज साकार होऊ शकणार नाही.

संविधानाने अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. देशाची एकता व अखंडता जपणे, संविधानाचा सन्मान करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, सामाजिक सलोखा राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. मनाला येईल तसे वागणे, नियम मोडणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान




करणे हे स्वातंत्र्याचे लक्षण नाही. आज अनेकदा स्वातंत्र्याचा गैरअर्थ लावला जातो. शासकीय मालमत्तेची तोडफोड, रस्ते, बस, शाळा, रुग्णालये यांचे नुकसान केले जाते. ही संपत्ती कोणाची आहे याचा विचार न करता बेपर्वाईने वागले जाते. प्रत्यक्षात ही संपत्ती शासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची आहे. माझी गोष्ट आहे म्हणून तिची काळजी घेणे आवश्यक असते, तसेच सार्वजनिक साधनसंपत्तीची काळजी घेणे हेही आपले कर्तव्य आहे.

शासन विविध योजना समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी राबवत असते. शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र केवळ पैसा मिळतो किंवा सुविधा मिळतात म्हणून खोट्या कागदपत्रांच्या आधारे योजनांचा लाभ घेण्याची वृत्ती वाढत आहे. यामुळे खरे गरजू लाभापासून वंचित राहतात. ही बाब संविधानाच्या मूल्यांना धरून नाही. प्रामाणिकपणा, सचोटी आणि नैतिकता हे संविधानाचे मूळ तत्व आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे.

जागतिक पातळीवर भारताची ओळख वाढत असताना प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारत महासत्ता बनणार असेल तर ते केवळ भाषणातून किंवा आकड्यांतून नाही तर प्रत्यक्ष कृतीतून होईल. शिक्षण घेऊन दुसऱ्या देशात सेवा करण्यापेक्षा आपल्या देशातच प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रउभारणीत योगदान देणे हे खरे देशप्रेम आहे. कौशल्य विकास, मेहनत, नवोपक्रम आणि सामाजिक बांधिलकी याच्या बळावरच भारत प्रगती करू शकतो.

"भारत माझा देश आहे" असे म्हणताना हे शब्द केवळ उच्चारापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वृत्तीत उतरला पाहिजे. मी जेव्हा म्हणतो भारत माझा आहे, तेव्हा भारतातील प्रत्येक गोष्ट माझी आहे ही भावना निर्माण झाली पाहिजे. रस्ते, शाळा, पाणी, वीज, सार्वजनिक सुविधा यांची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. छोट्या छोट्या कृतीतूनच मोठा बदल घडतो.

प्रजासत्ताक दिन आपल्याला संविधानाची अस्मिता जपण्याची आठवण करून देतो. संविधान हा केवळ ग्रंथ नसून तो आपल्या आचरणातून जिवंत राहणारा दस्तऐवज आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन जीवनात झाली तरच भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राष्ट्र ठरेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान ही भारताच्या भवितव्याची हमी आहे. या संविधानाचा सन्मान करणे म्हणजे केवळ उत्सव साजरा करणे नव्हे तर संविधानातील मूल्ये जगणे होय. हाच प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ आणि संदेश आहे.

- ९१४५७७९०५०

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मिलींद विश्राम पवनीपगार, सुमित प्रिंटर्स, बी-१५, एनआयटी कॉम्प्लेक्स, मेडिकल रोड, उंटखाना, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२४ येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# शेकापूर जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांची नावे 'आर्टेमिस-२' मोहिमेत

## शेकापूर विदर्भातील पहिली शाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
तालुक्यातील जंगलव्याप्त व आदिवासी बहुल भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेकापूर येथील तेरा विद्यार्थी व दोन शिक्षकांची नावे थेट चंद्रावर जाणाऱ्या नासाच्या आंतरराष्ट्रीय अवकाश मोहिमेत नोंदवली गेली आहेत. आर्टेमिस-२ या ऐतिहासिक मोहिमेत व्हर्च्युअल गेस्ट म्हणून त्यांच्या सहभागाची अधिकृत नोंद झाली असून, नासाकडून त्यांना ऑनलाईन बोर्डिंग पास प्राप्त झाले आहेत. हा क्षण शाळेसह संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

आर्टेमिस-२ मोहिमेसाठी नासाने जगभरातून व्हर्च्युअल गेस्ट म्हणून सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यास शेकापूर शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत नोंदणी केली होती. नोंदणीनंतर संबंधितांना बोर्डिंग पास व नोंदणी क्रमांक ऑनलाईन स्वरूपात देण्यात आले आहेत.

या मोहिमेत शाळेचे मुख्याध्यापक डॉ. राजेंद्र विमल रामहरी टेकाडे, स्वयंसेविका मनिषा रघुनाथ धुर्वे तसेच विद्यार्थी मनस्वी धुर्वे, कशिश कौरती, निर्भय मरकामे, प्रियांशी नेहारे, गिरीष मरकामे, धनश्री कौरती, विधी धुर्वे, धनश्री कळसाईत, पायल कुंभरे, युग नेवारे, अथर्व कौरती, सार्थक शेंदरे, रियान राऊत यांनी नोंदणी केली असून त्यांना ऑनलाईन बोर्डिंग पास प्राप्त झाले आहेत.




या विद्यार्थ्यांची नावे एका विशेष एसडी कार्डमध्ये संग्रहित करून ओरियन अंतराळयानाद्वारे चंद्राकडे पाठवली जाणार आहेत.

सुमारे दहा दिवस चालणारी आर्टेमिस-२ मोहीम एप्रिल २०२६ पूर्वी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून प्रक्षेपित होणार आहे. अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे सुमारे ४,६०० मैलांचा प्रवास करून पॅसिफिक महासागरात सुरक्षित परतणार आहेत.

या मोहिमेत नासाचे अंतराळवीर रीड वाइझमन, व्हिक्टर ग्लोव्हर, क्रिस्टीना कोच तसेच कॅनेडियन स्पेस एजन्सीचे अंतराळवीर जेरेमी हॅन्सन सहभागी होणार आहेत. स्पेस लॉन्च सिस्टीम (एसएलएस) रॉकेटद्वारे होणारी ही मोहीम चंद्रावर मानवी वसाहतीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे. या मोहिमेचे प्रक्षेपण विद्यार्थी व्हर्च्युअली पाहणार असून, नासाच्या अंतराळवीरांशी संवाद साधण्याचा मानस आहे. भविष्यात भारतीय वंशाच्या आणि नासाच्या सेवानिवृत्त अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांच्याशी विद्यार्थ्यांचा व्हर्च्युअल संवाद घडवून आणण्याचाही शाळेचा संकल्प आहे. या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी व पालकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

> जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक कुठेही कमी नाहीत. त्यांना जागतिक स्तरावरील अद्ययावत ज्ञान व तंत्रज्ञानाची योग्य ओळख करून दिल्यास ते नक्कीच उजवे ठरतात. विद्यार्थ्यांच्या हितासाठी नवनवीन प्रयोग करणे हेच शिक्षणाचे खरे सामर्थ्य आहे. आर्टेमिस-२ मोहिमेतील सहभागातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे."
>
> **- डॉ. राजेंद्र रामहरी टेकाडे**
> **मुख्याध्यापक**
> **जि.प.प्राथमिक शाळा, शेकापूर**

# बल्लारपूरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**
भारतीय प्रजासत्ताकाच्या ७७ व्या वर्धापन दिन मोठ्या उत्साहात बल्लारपूरात साजरा करण्यात आला या निमित्ताने मुख्य शासकीय कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडला यावेळी उपविभागीय अधिकारी अर्जुन पावरा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस विभागातर्फे सशस्त्र मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमास तहसीलदार रेणुका कोकाटे, नायब तहसीलदार महेंद्र फुलझेले, नायब तहसीलदार अजय मल्लेलवार, निरीक्षण अधिकारी प्राजक्ता सोमलकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिकांचे



पाल्य, सेवानिवृत्त सैनिक तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त बल्लारपूर नगर परिषद यांच्या वतीने सकाळी १० वा ध्वजवंदन कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

या प्रसंगी नगराध्यक्षा, नगर परिषद बल्लारपूर डॉ. अल्का अनिल वाढई यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा गौरव करण्यात आला. प्रजासत्ताक दिन हा भारतीय संविधान अंमलात आल्याचा गौरवशाली दिवस असून, लोकशाही, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा दिवस आहे. या दिनाच्या औचित्याने उपस्थित सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुख्याधिकारी विशाल वाघ, उपमुख्याधिकारी रविंद्र भांडारवार, उपमुख्याधिकारी संगिता उमरे, कार्यालयीन अधीक्षक नंदू सातपुते, शहर समन्वयक मयुरी भोयर, नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका तसेच विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

बल्लारपूर शहरातील प्राचीन ऐतिहासिक किल्ल्यावर सकाळी १०.३५ वाजता बल्लारपूर नगर परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र सत्यदेव आर्य यांच्या हस्ते ध्वजारोहन पार पडले यावेळी गोंड राजाचे वंशज वीरेंद्र महाराज यांच्यासह मुख्याधिकारी विशाल वाघ, अल्का वाढई नगराध्यक्ष बल्लारपूर यांच्यासह माजी नगराध्यक्ष, नगरसेवक अधिकारी व कर्मचारी, पोलीस दल, पत्रकार, शालेय विद्यार्थी व नागरिकांची उपस्थिती होती. बल्लारपूर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गांधी चौक येथे काँग्रेस चे शहर अध्यक्ष अब्दुल करीम यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी काँग्रेस चे पदाधिकारी, कार्यकर्ते, नगर सेवक, सेविका उपस्थित होते. यासह बल्लारपूर शहरातील विविध राजकीय पक्षाच्या कार्यालयात (काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, आम आदमी पक्ष) प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यासोबतच अग्निशमन विभाग, पोलीस स्टेशन बल्लारपूर, ग्रामीण रुग्णालय बल्लारपूर, बल्लारपूर शहरातील विविध शाळा महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

## नेरला येथे दोन दिवसीय मंडईपूर्वी आयोजित दोन दिवसीय कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी** : चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या नेरला येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दोन दिवसीय मंडई उत्सवापूर्वी आयोजित शनिवार (दि. २४ जानेवारी) पासून सुरू झालेल्या, नवयुवक सांस्कृतिक मंडळ व समस्त गावकरी नेरलातर्फे आयोजित दोन दिवसीय कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उद्घाटनीय कार्यक्रमाला प्रामुख्याने भाजपा चाचेर मंडळ अध्यक्ष रवी चव्हाण, ग्रा.पं.खंडाळा सरपंच संकेत झाडे, माजी उपसभापती खेमराज चाफले, माजी सरपंच तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती मौदा प्रमोद बरबटे, उपसरपंच रोशन मेश्राम,मनोज नौकरकार, माजी सरपंच मोमदेव देशमुख, बंडु वाणी, कुणाल खोब्रागडे, गावकरी मंडळी व महिला मंडळी उपस्थित होते.



## हळदी-कुंकू सामाजिक एकतेचे प्रतीक : वैशाली डांगोरे

### संक्रांत संगीत सोबत महिलांच्या विविध स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
पारंपारिक हळदी-कुंकवाची पद्धत हा केवळ सण समारंभ नसून महिलांचा सन्मान,सामाजिक एकता आणि सांस्कृतिक जाणीव चे प्रतीक आहे. संक्रांत महोत्सव निमित्ताने महिला उत्थानासाठी विविध कार्यक्रम,तथा विविध स्पर्धा उपक्रमामुळे आपल्या प्राचीन संस्कृतीला बळ मिळते आणि महिलांच्या एकत्रिकरणाने महिला सबलीकरणाला सुद्धा फार मोठं बळ मिळत असल्याचे विचार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विचारमंच अध्यक्ष वैशालीताई




संजय डांगोरे यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले सभागृह अनुसया पुरम काटोल येथे सावित्रीबाई फुले विचारमंचच्या वतीने आयोजित संक्रांत हळदीकुंकू समारंभ मधे कार्यक्रम चे अध्यक्षा सौ वैशाली डांगोरे,प्रमुख अतिथी कमलताई तरार तथा मंचाच्या सचिव एड.भैरवीताई टेकाडे या होत्या.

यावेळी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी संगीताताई सुर्यवंशी तथा शुभम सुर्यवंशी यांचा बहारदार गितसंगीत संक्रांत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमचे संचालन शुभांगी सातपुते यांनी केले. आभार प्रदर्शन एड. भैरवी टेकाडे यांनी केले. भरगच्च उपस्थितीने आणि सुंदर आयोजनाने कार्यक्रम यशस्वी झाला.

यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्याकरता मोना खरबडे, कविता कांडलकर, मंगला श्रीखंडे, प्रतिभा भेलकर, कांचन टेंभे, वैशाली श्रीखंडे, आशुका टाकरखेडे, सुषमा टेकाडे प्रमिला मुसळे, लता चरडे, तृप्ती वैद्य, संगीता वेवहारे, मनीषा दारव्हेकर, मेघा खुरपडे, ज्योती पर्वत, राऊतताई, संबोधी ढोके, पवार ताई, नंदा भोयर, पाटोळेताई, वैशाली आजनकर, अंजली भेलकर, बागडे आदींचे सहकार्य लाभले.

# पारशिवनी तालुक्यातील नयाकुंडची उंच भरारी!

- गावातील संपूर्ण घरे इंटरनेटने जुळले
- डिजीटल इंडियाची सुरुवात , नयाकुंड ग्रामपंचायतला यश

***गट विकास अधिकारी सुभाष जाधव, ग्राम पंचायत सरपंच, ग्रामसेवक, सदस्यांच्या पुढाकाराने नयाकुंड गाव जिल्ह्यात इंटरनेटच्या शिखरांवर. नया कुंड गाव बी,एस,एन,एल वायफायी ने कनेक्ट. ओ.टी.एस टावर सिस्टीम***

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
आधुनिक युगात संगणक प्रणालीद्वारे जलद गतीने कामे व्हावी, कामात पारदर्शकता असावी, गाव खेडे इंटरनेटने जुळलयास प्रत्येक बाबतीत यथा योग माहिती मिळावी, आधुनिकरणाला चालना मिळावी करीता नयाकुंड ग्रामपंचायत सरपंच, सचिव, सदस्य, गट विकास अधिकारी यांच्या अथक प्रयत्नांमुळे संपूर्ण ग्राम इंटरनेट ने जुळल्या गेले. २२(जाने.) ला बी.एस.एन.एल चे निर्देशक विवेक बाझल भारत सरकार नवी दिल्ली यांच्या हस्ते ओ.टी.एस. टावर सिस्टीम चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बाझल यांनी दुराचार निगम मार्फत वेगवान सेवा दिल्या जात आहे. तर आज न्या कुंड गाव पूणपणे इंटरनेट सेवेने जुळले असल्याने जलद गतीने नागरीकाची कामे होतील.सपूण विश्वाशी गाव जोडले गेले असल्याने आधुणीकरणाला बळ मिळेल.याचया अभिमान असुन तालुकयाती प्रत्येक गाव इंटरनेटने जुळल्या जाईल त्याकरीता लागणार्या सौदी सुविधा बी.एस.एन.एल तर्फे पुरविण्याच्या प्रयत्न केला जाईल.

यावेळी ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे जिल्हाधिकारी नागपूर व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, यांच्याशी चर्चा करीत शासकीय कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांच्याशी हितगुज करून नयाकुंड प्रमाणेच सर्व ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा करून घेण्याकरिता प्रवृत्त करावे असे आवाहन केले. विवेक बाझल यांनी सोबतच महिला महाविद्यालय येथील आलेल्या विद्यार्थ्यांशी अक टेक्नॉलॉजी बाबत चर्चा करून



त्यांना साध्या व सोपा शब्दात अकटेक्नॉलॉजी चे महत्त्व पूर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी हरेंद्र कुमार महाप्रबंधक, महाराष्ट्र परिमंडळ मुंबई, यश पानेकर प्रधान महाप्रबंधक नागपूर, प्रशांत पनतोडे महाप्रबंधक नागपूर, प्रशांत गणवीर उपमहाप्रबंधक, नागपूर, अनिल उंमरे, सहाय्यक महाप्रबंधक नागपूर ग्रामीण, सुभाष जाधव गटविकास अधिकारी पंचायत समिती पारशिवनी, विजू थॉमस सर जनरल मॅनेजर सूर्यअंबा स्पिनीग मिल नयाकुंड, डॉक्टर अनंत आनंद अध्यक्ष रमाई महिला महाविद्यालय नयाकुंड, सुधीर अवस्थी सरपंच ग्रामपंचायत नयाकुंड उपसरपंच अल्केश वाघाडे, यशवंत लिखार, प्रभाकर वाघ विस्तार अधिकारी पंचायत, सचिव प्रियंका बोरकर, पंचायत समितीचे गट समन्वयक मुनेश दुपारे, गुंडेराव कुहीटे, महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी प्राध्यापक, गावातील सर्व नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी इत्यादी सर्व उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन मुनेश दुपारे यांनी केले.

### थोडक्यात

## दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सिर्सीच्या दिव्यांग आय.टी.आय.ची दमदार कामगिरी




**दै. सिंहवाणी वृत्त, सिर्सी**
दि. २१ आणि २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद नागपूर व दिव्यांग मुलांसाठी ३५ कार्यरत शासकीय अनुदानित शाळा कर्मशाळा यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धाचे आयोजन नागपूर येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय च्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते सदर स्पर्धेत श्री संत जगनाडे महाराज संमिश्र दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सिर्सी ता.उमरेड जि.नागपूर येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध खेळांमध्ये गोल्ड मेडल ,सिल्वर मेडल आणि ब्रांझ मेडल प्राप्त केले दिव्यांग प्रशिक्षणार्थी पियुष गजाननजी केणे यांनी १०० मीटर धावणे गोल्ड मेडल आणि ५० मीटर पोहणे मध्ये गोल्ड मेडल, सार्थक कृष्णराव वानखेडे यांनी ५० मीटर धावणे गोल्ड मेडल तसेच १०० मीटर व्हिल चेअर रेस मध्ये द्वितीय क्रमांकाचे सिल्वर मेडल प्राप्त केले.

मोहित विजयराव धूर्वे यांनी ५० मीटर पोहणे प्रथम येऊन गोल्ड मेडल तर ५० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल प्राप्त केले, डंभारे यांनी २०० मीटर धावणे प्रथम क्रमांकाचे मेडल प्राप्त केले, प्रेम रमेशराव मल्ले यांनी शंभर मीटर धावणे व्दितीय क्रमांकाचे सिल्वर मेडल तर २०० मीटर धावणे तृतीय क्रमांकाचे ब्रांझ मेडल प्राप्त केले, रितिक मिलिंद गजभिये याने २०० मीटर धावणे द्वितीय क्रमांकाचे सिल्वर मेडल प्राप्त केले स्पर्धेत दीप धर्मेंद्रराव शिंगणापूरे, समीर सुदर्शनराव गणोरकर, इ. विद्यार्थ्यांना सहभाग घेतला.

विजेत्या दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री माननीय अजयजी अहिवळे साहेब, सचिनजी रामटेके सर प्रवीणजी मोंढे सर जिल्हा परिषद नागपूर इत्यादी मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले क्रीडा स्पधेर्तील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेकरिता प्रशिक्षण केंद्रातील व्यवस्थापकीय अधीक्षक योगेश पां. कामडी, भास्कर बोरकर गृहपाल यांनी अथक परिश्रम घेतले तसेच विवेक वानखेडे, संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## आकाशझेपतर्फे जि. प. शाळेला शैक्षणिक साहित्याचे वाटप




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
आकाशझेप फाऊंडेशन रामटेक द्वारा संचालित आम्ही भारतीय अभियानतर्फे पारशिवनी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पेंच प्रकल्प येथे २४ जानेवारीला शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आकाशझेप फाऊंडेशनचे सचिव व आम्ही भारतीय अभियानाचे मुख्य संयोजक साक्षोधन कडबे, अध्यक्ष प्रा. अरविंद दुनेदार, कोषाध्यक्ष दिलीप पवार, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र भलावी, सहायक शिक्षक संजय लोखंडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांमध्ये वाचन-लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी मराठी चौदाखडी इंग्रजीत, अल्फाबेट, मराठी मुळाक्षरांसाठी इंग्रजी अक्षरे, अंकगणितीय सरावासाठी पाढ्यांचे टेबल अशा शैक्षणिक साहित्याची शाळेला शिक्षक संजय लोखंडे यांनी आकाशझेपचे सचिव साक्षोधन कडबे यांचेकडे विनंतीवजा मागणी केली होती. गणराज्य दिनाच्या राष्ट्रीय पवार्चे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद लहरी उमटल्या. विद्यार्थ्यांच्या हिताची मागणी पूर्ण केल्याबद्दल मुख्याध्यापक राजेंद्र भलावी यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

## रन फॉर मौदा भव्य मॅरेथॉन- एक धाव मौदासाठी नगर पंचायतचे ढिसाळ नियोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**
मौदा येथे नगरपंचायत तर्फे आज दिनांक २५जानेवारीला सकाळी ६ वाजता रन फॉर मौदा- मौदयासाठी धावूया, समूहातील प्राण्यांसाठी करुणा जागवूया या उद्देशाने भव्य मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. माजी आमदार टेकचंद सावरकर, नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके,उपनगराध्यक्ष शुभम तिघरे यांच्या हस्ते झेंडा दाखवून धाव सुरू करण्यात आली. यावेळी सर्व नगरसेवक उपस्थित होते.

एका चांगल्या उद्देशाने या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते परंतु नगर पंचायत चे नियोजन ढिसाळ असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी सर्व शाळांना पत्र देण्यात आले तसेच मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला होता, त्यानुसार नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते परंतु सर्व स्पर्धक यांना टी शर्ट देण्यात आले नाही. काही स्पर्धक अर्ध्या रस्ता बाईकवर येऊन सामील झाले.तर लहान मुलांना चक्रधर स्वामी गेटवर स्पर्धा सुरू होईल असे सांगण्यात आले म्हणून अनेक लहान मुले तिथे येऊन उभी राहिली परंतु त्यांची स्पर्धा कुठ सुरू झाली हे कळले नाही. तर काही स्पर्धकांनी ठरवलेल्या मार्गावरून न जाता अर्ध्या रस्त्यातच मार्ग बदललं असे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले.



थोडक्यात

## जनसेवा किराणा असोसिएसनतर्फे शरबत वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

रन फॉर मौदा नगरपंचायत मौदा तर्फे रविवारी सकाळी 6 वाजता तिडके कॉलेज रोड ते छत्रपती शिवाजी महाराज महाराज चौक पर्यंत भव्य मॅराथान स्पर्धा घेण्यात आली. तालुक्यातील लहान, मोठे व्यक्ती व शाळकरी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. या प्रसंगी नगर पंचायत मौदा येथील जनसेवा कीराणा असोशिएशन मौदाकडून भव्य शरबत वितरणाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सर्व स्पर्धक व जनतेने या शरबत चा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जनसेवा किराणा असोशिएयन चे अध्यक्ष शुभम नाकाडे, उपाध्यक्ष विपूल मानकर, सचीव राजेंद्र पिसे कोषाध्यक्ष विनोद मेहर,कार्याध्यक्ष मुन्ना जुनगडे मानकर मॅडम रमेश मस्के, राजेंद्र जैसवाल, महली पंचबुधे, रौनक भैसवर, नाना धांडे, कामदेव दुबे, भोंगाडे, बावनकुळे व इतर पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

## दवलामेटी येथे ९ कुंडीय गायत्री महायज्ञ उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

अखिल विश्व गायत्री परिवार, हरिद्वार यांच्या तत्त्वावधानात प्रज्ञा महिला मंडळ, दवलामेटी यांच्यावतीने भागवत देवी शर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व बसंत पंचमीच्या पर्वावर २१ ते २३ जानेवारी दरम्यान एलआयजी माडा कॉलनी क्रीडांगणात ९ कुंडीय गायत्री महायज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले. २१ जानेवारी रोजी कलश यात्रेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. २२ जानेवारी रोजी सकाळी महायज्ञ तर सायंकाळी ११०० दीपकांचा दीप महायज्ञ विशेष आकर्षण ठरला. २३ जानेवारी रोजी बसंत पंचमीनिमित्त सरस्वती पूजन, अन्य संस्कार व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या तीन दिवसीय कार्यक्रमात शेकडो भाविकांनी सहभाग घेतला. हरिद्वार येथील पू. दीक्षा दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. हा उपक्रम अध्यक्षा निर्मला राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाला. कार्यक्रमास आमदार समीरजी मेघे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. आभार प्रदर्शन वैशाली कामगाते यांनी केले.

## स्व. विठ्ठलरावजी टालाटुले यांच्या स्मरणार्थ संस्थेअंतर्गत आंतरशालेय क्रीडा स्पर्धा



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच विठ्ठलरावजी टालाटुले, संस्थापक, दि जनसेवक शिक्षण संस्था तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, नागपूर यांच्या पुण्यस्मरणार्थ संस्थेअंतर्गत आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचें आयोजन करण्यात आले. हे आयोजन डोरली विद्यालय, डोरली येथील प्रांगणावर पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष, संस्थेचे सचिव श्री. जयंत टालाटुले हे होते. तसेच उद्घाटक म्हणून संस्थेच्या संचालिका तथा ग्रामविकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा, येथील प्राचार्या डॉ. वैशाली जयंत टालाटुले होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डोरली येथील माजी सरपंच सुभाष भिंगारे, रवि भिंगारे, डोरली विद्यालयाचे मुख्याध्यापक शिरपूरकर, ग्रामविकास विद्यालय रिधोराचे मुख्याध्यापक बोलके, ग्रामविकास विद्यालय ढवळापूरचे मुख्याध्यापक काकडे हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे परिसरातील प्रतिष्ठित मंडळी आणि पालक वर्ग सुद्धा विद्यार्थ्यांचे सामने पाहण्यासाठी आणि बक्षीस वितरणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आंतर शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये हॉलीबॉल व कबड्डी या दोन सामन्यांचा समावेश होता. या सामन्यांसाठी मुले आणि मुली दोन्ही संघ सहभागी होते. हॉलीबॉल मॅचमध्ये ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मेटपांजरा हा मुलांचा संघ विजेता ठरला. तर मुलींमध्ये, ग्रामविकास विद्यालय, रिधोरा हा संघ विजयी झाला. त्याचप्रमाणे कबड्डी स्पर्धेमध्ये मुलांमध्ये ग्रामविकास विद्यालय रिधोरा येथील संघ विजेता झाला. तर मुलींमध्ये ग्रामविकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा येथील संघ विजयी झाला.

सर्व विजयी संघाचे पाहुणे मंडळींच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून लाभलेल्या डॉ. वैशाली टालाटुले यांनी आपल्या भाषणातून ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांचे कौतुक करताना त्यांनी आवर्जून कोणत्याही प्रकारचे क्लब न लावता स्वतः च्या मेहनतीने इतक्या चांगल्या पद्धतीचे खेळ खेळून इतकेच नव्हे तर आपल्या देशसेवेसाठी आपल्या याच ग्रामीण भागातील मुले आर्मी मध्ये, पोलीस विभागामध्ये यश मिळवतात हे सर्व त्यांच्या स्वतः च्या मेहनतीने ते करत असतात अशा शब्दात आपल्या मुलांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव जयंत टालाटुले यांनी आपल्या भाषणातून मुलांचे कौतुक करताना आपल्या ग्रामीण भागातील मुले हे खेळाबरोबर अभ्यासात पण पुढे असल्याचे म्हटले कारण कोणतीही शासकीय नोकरी मिळवताना स्पर्धा परीक्षा ही पास करावी लागते व त्यामध्ये आपली मुलं ती परीक्षा पास करून स्वतः च्या पायावर उभे होताना दिसत आहे. आपल्या शालेय मुलांनी सुद्धा खेळाप्रमाणे अभ्यासात सुद्धा नावलौकिक मिळवावा असे आवाहन मुलांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डोरली विद्यालयाचे मुख्याध्यापक शिरपूरकर सर यांनी केले. तर संचालन दुर्गे आणि कार्यक्रमाचे आभार नन्नावरे यांनी केले.

# नदीतील वाळू माफियांचा धुमाकूळ

### नागपूर जिल्हा हद्दीत सर्रास उत्खनन, प्रशासनाची बघ्याची भूमिका की संगनमत?

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

वर्धा नदीतील वाळू उत्खननावर नियंत्रण ठेवण्याचे शासनाचे आदेश केवळ कागदापुरतेच मर्यादित राहिले असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. अमरावती व नागपूर जिल्ह्याच्या सीमारेषेवर वाळू माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, नागपूर जिल्ह्याच्या हद्दीत बिनधास्त अवैध उत्खनन सुरू असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे.

वरुड तालुक्यातील मौजा देऊतवाडा व पवनी सक्राजी शिवारातील वाळू घाटांचा लिलाव अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला आहे. मात्र नदीपात्राचे स्पष्ट सीमांकन न करता कंत्राटदाराला घाटाचा



ताबा देण्यात आल्याने या घाटातून थेट नागपूर जिल्ह्याच्या हद्दीत उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर**

नदीपात्र दोन जिल्ह्यांत विभागले असताना सीमांकन करूनच घाटाचा ताबा देण्याचे स्पष्ट आदेश अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. मात्र वरुड तहसीलदारांनी या आदेशांकडे दुर्लक्ष करत सीमांकन न करताच वाळू घाटाचा ताबा दिल्यामुळे कंत्राटदाराचा मनमानी कारभार सुरू झाल्याचे चित्र आहे. परिणामी नागपूर जिल्ह्याच्या हद्दीत महसूल बुडवणारे उत्खनन खुलेआम सुरू आहे.

**कारवाईऐवजी यंत्रसामग्रीला अभय?**

या अवैध उत्खननाबाबत नरखेड तहसीलदारांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. चौकशीसाठी नदीपात्रात गेलेल्या स्थानिक मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी नागपूर जिल्ह्याच्या हद्दीत सुरू असलेल्या उत्खननावर कठोर कारवाई करण्याऐवजी ट्रॅक्टर व जेसीबी यांना सोडून दिल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाची छाया गडद झाली आहे. कारवाई न करता यंत्रसामग्री कशी सोडण्यात आली? यामागे कोणाचा वरदहस्त आहे? असे थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

**घरकुल लाभार्थ्यांवर अन्याय**

घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासनाकडून वाळूसाठी पास दिले जात असताना, प्रत्यक्षात मात्र वाळू माफियांचे अवैध उत्खनन सुरूच असल्याने सर्वसामान्य गरजू नागरिकांना वाळू मिळणार की नाही, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हक्काच्या शासकीय योजनेपासून लाभार्थी वंचित राहणार का, अशी संतप्त भावना परिसरात व्यक्त होत आहे.

**पर्यावरण, महसूल आणि कायदा धोक्यात**

वर्धा नदीतील अवैध उत्खननामुळे नदीपात्राचे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणीय नुकसान होत असून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. तरीही प्रशासनाची संशयास्पद शांतता हा प्रकार केवळ दुर्लक्षाचा की संगनमताचा, असा सवाल उपस्थित करत आहे.

**प्रशासनाचे स्पष्टीकरण**

दरम्यान, या प्रकरणावर जिल्हा खनिकर्म अधिकारी नागपूर अतुल दोड यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, तहसीलदार नरखेड आणि तहसीलदार वरुड यांना संयुक्त सीमांकन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यावर त्वरित कार्यवाही केली जाईल.

मात्र केवळ निर्देश देऊन प्रश्न सुटणार का, की प्रत्यक्षात अवैध उत्खननावर कठोर कारवाई होणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. वाळू माफियांवर कारवाई कधी होणार? दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का? हे प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहेत.

## बाल विज्ञान प्रदर्शनी पाहण्यासाठी शिक्षणाधिकारी थेट तोंडलीत

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक २४ जानेवारी २०२६ ला बाल विज्ञान प्रदर्शनी,पक्षी चित्र प्रदर्शनी, ऐतिहासिक नाणे प्रदर्शनी,मैदानी खेळ,आनंद मेळावा यांचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी बाल विज्ञान प्रदर्शनी आपले विविध प्रयोग सादर केले. प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी नेहमी नवनवीन उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात असाच हा बहुआयामी कार्यक्रम बघण्यासाठी संपूर्ण शैक्षणिक अधिकारी टीम थेट तोंडली हजर झाली. हे बघून शाळेचे माजी विद्यार्थी गावचे सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच सहशिक्षक यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

या प्रसंगी नागपूर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी निखिल भुयार, उपशिक्षणाधिकारी किरण चीनकुरे, तालुका शिवसेना प्रमुख



प्रशांत भुरे,मौदा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी संकेत मरस्ककोल्हे, शिक्षण विस्तार अधिकारी रामेश्वर भक्तवर्ती ललिता चामट,धानोली केंद्राची केंद्रप्रमुख अरविंद भिवगडे अरोली पोलीस उपनिरीक्षक स्नेहल राऊत, तोंडली सरपंच दर्शना बागडे, उपसरपंच रामपाल धांडे, सचिव वैभव बावनकर, अरोली सरपंचा रोशनी प्रशांत भुरे सह ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी व गावातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांनी संग्रहित केलेली कवडीपासून ते रुपयापर्यंत नाण्यांचा प्रवास प्रत्यक्षरीत्या बघून सर्वांनी शाळेच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. तसेच मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना पक्षांची ओळख व त्यांचा जीवनक्रम समजावा यासाठी आयोजित केलेली चित्र प्रदर्शनी जे चित्र त्यांनी स्वतःच्या हाताने रेखाटित करून रंगभरण केलेली होती हे बघून सर्वांकडे कौतुक करण्यास शब्द अपुरे पडले. एका सुंदर बहुआयामी कार्यक्रम बघून इतर शाळांनीही याचा आदर्श घ्यावा असे उद्गार मान्यवरांनी काढले. अधिकाऱ्यांनी आनंद मेळाव्यातील पदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती माता-पालक वर्ग यांची लेझीम नृत्य व गावकऱ्यांचा कार्यक्रमातील उत्स्फूर्त सहभाग बघून येथील विद्यार्थी नक्कीच उज्वल भविष्य घडू शकतील असा विश्वास किरण चिनकुरे उपशिक्षणाधिकारी नागपूर यांनी व्यक्त केला.

शाळेच्या या बहुआयामी कार्यक्रम व्यवस्थापन व आयोजन बघून मुख्याध्यापक अनुराधा धुर्डे व सहशिक्षक निलेश जाधव याचे निखिल भुयार शिक्षणाधिकारी नागपूर यांनी कौतुक केले. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## जि.प.हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कोदामेंढी येथे शनिवार (दि. २४ जानेवारी) ला मुख्याध्यापक सी. एस. शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले.

गीत, संगीत, नृत्य आणि नाटिकांच्या सादरीकरणाने संपूर्ण शालेय परिसर सांस्कृतिक रंगात न्हाऊन निघाला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांचे दर्शन या निमित्ताने घडले.

कार्यक्रमाचा शुभारंभ शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती दिक्षिका कौशिक आणि मुख्याध्यापक सी. एस. शिवणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिक्षिका कौशिक होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रा. प कोदामेंढी सरपंच आशिष बावनकुळे, उपसरपंच गोपाल गिरमेकर, माजी सरपंच भगवान बावनकुळे, ग्रामपंचायत सदस्यगण विष्णु बावनकुळे, खुशाल शिवणकर, सदानंद मेश्राम, अनिता हटवार, हेमलता देवतळे, अंजली मोहुर्ले, गणेश मोहुर्ले,



सुखदेव काचुरे, कल्याणी हटवार, अर्चना बावनकुळे यांच्यासह इतर अनेक मान्यवर, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात दिक्षिका कौशिक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, कला व क्रीडा गुणांसोबत येण्याऱ्या परीक्षेलाही निर्भीडपने सामोरे जा, आणि यशस्वी व्हा. सरपंच आशिष बावनकुळे यांनी आपल्या भाषणात शाळेच्या प्रगतीचा गौरव केला, "केवळ अभ्यासात हुशार असणे म्हणजे प्रगती नव्हे, तर विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. तसेच गोपाल गिरमेकर व भगवान बावनकुळे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि भविष्यात शाळेच्या विकासासाठी गाव स्तरावरून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक भाषणानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली.

हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून परिश्रम घेतले होते. कार्यक्रमाच्या नियोजनात आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात मुख्याध्यापक सी. एस. शिवणकर व शाळेचे शिक्षकवृंद मनोहर अहिर, चंदा जाधव, शिल्पा गिरे, किशोर नागमोते, वैभवी अभ्यंकर, सुरेखा कुसरे, माधुरी किन्नाके, रमा हुमणे,मेघश्याम राठोड (कनिष्ठ सहाय्यक), जयश्री बोकडे, योगिता भुरे, धनपाल महादुले, स्नेहा हटवार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या चोख पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रत्येक कलाकृतीमागे या शिक्षकांचे अथक परिश्रम आणि मार्गदर्शन दिसून येत होते. कोदामेंढी आणि परिसरातील पालकांनी या स्नेहसंमेलनाला मोठी गर्दी केली होती. आपल्या पाल्यांना रंगमंचावर कला सादर करताना पाहून पालकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे भाव दिसत होते. शाळेच्या शिस्तबद्ध नियोजनाचे आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नागपूर-पारशिवनी एसटी बसची अनियमितता!

**▸ प्रवाश्यांना डोकेदुखी ▸ प्रवासी विद्यार्थांना मानसिक त्रास ▸ आर्थिक भुर्दंड, एसटी महामंडळाची मनमानी कारभार ▸ विद्यार्थांची तारांबळ ▸ तासनतास एसटी बसच्या फेऱ्या विलंबाने ▸ प्रवाशी तात्काळत ▸ आमदार, खासदारांचे, अक्षय दुर्लक्ष.**

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी- रूपेश खंडारे**

पारशिवनीते नागपुर या मार्गाने दरोरोज शेकडो शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षणासाठी नागपुर व इतरत्र एसटी बसने प्रवास करीत शिक्षण घेत असतात. मात्र नागपुर ते पारशिवनी एस टी बसचे वेळापत्रक ढासळल्याने एसटी बसच्या फेऱ्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता दरोरोज होत असल्याने प्रवाशयाची विद्यार्थांची मोठी तारांबळ उडत असल्याने विद्यार्थांना रात्रीला नाईलाजाने पर्यायी साधनाने पारशिवनीला यावे लागत आहे. त्यात त्यांच्या वेळ वाया जात असून आर्थिक नुकसानीसह मानसिक त्रास सहन करण्याची वेळ महामंडळाच्या बेशिस्त कामचुकार अधिकारी कर्मचारी यांच्यामुळे येत असल्याची ओरड प्रवासी वर्गातून केली जात आहे.

तर या क्षेत्राचे लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी मात्र या समस्या सोडवण्यात ससपेल अपयशी ठरल्याने त्यांच्या विरोधात प्रवाशी नागरीकांमध्ये रोष दिसुन येत आहे.

नागपूर येथील वर्धमान नगर एसटी बस कार्यालयातुन पारशिवनी करीता एसटी बसचे वेळापत्रक ठरविले जाते. मात्र त्या वेळापत्रकानुसारच एसटी बसचे परिचलन होत नाही. अधिकारी मनमानी वूततीने कारभार करीत असल्याने वेळेवर एसटी बस नागपुर शहरातून सोडल्या जात नसल्याने पारशिवनी बस स्थानकावर एसटी बस पोहचू शत नाही.

**संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा!**

वर्धमान नगर एसटी बस कार्यालय येथील अधिकारी पारशिवनी शहरात करीता वेळापत्रक तयार करुन वेळेवर बसेस सोडत नसल्याने किंवा एस टी बस ची फेरया रद्द करत असल्याने पारशिवनी शहराकडे येणारे प्रवाशयाची मोठी दमछाक होते.

सायंकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात प्रवाशी विद्यार्थी, नागरीक नागपुर ते पारशिवनी प्रवाश करतात मात्र सायंकाळच्या वेळी या बसफेऱ्या रद्द करणे, विलंबाने चालविले, कमी प्रमाणात बसेस सोडने, वेळेवर बस फेरी रद्द करणे असे प्रकार होत असल्याने प्रवास्यांना मोठ्या मानसिक त्रासाला सामोरं जावे लागते. नाईलाजाने खाजगी वाहणाचा उपयोग करुन आर्थिक नुकसान सहन करणयाची तसेच रात्रीला बस स्थानकातच मुक्काम करण्याची पाळी प्रवाशांवर येत आहे.

सायंकाळच्या वेळी पारशिवनी करीता नागपुरवरुन कमी बस फेरी असल्याने उपलब्ध




असलेल्या एसटी बसमध्ये १०५ ते ११० प्रवाशी जनावरांसारखे कोंबून प्रवाश्यांना प्रवास करण्याची पाळी या महामंडळाच्या निष्काळजी अधिकारामुळे प्रवशयावर आली आहे.

**आमदार, खासदार प्रवाशांच्या समस्येवर लक्ष देणार का?**

सामान्य नागरीकानी कीतीही तक्रारी केल्या तरी एसटी महामंडळाचे अधिकारी कर्मचारी या समस्या सोडवण्यात रस दाखवित असुन विनाकारण प्रवाशयाना मानसिक त्रास देत आहे. या बाबत अनेक दैनिक वृत्तपत्रात या समस्येविषयी बातम्या प्रकाशित होत असताना सुद्धा या क्षेत्राचे आमदार आशिष जैसवाल, खासदार श्याम कुमार बर्वे सुद्धा प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयतनशिल दिसून येत नसल्याने या आमदार खासदाला विरोधात मोठ्या प्रमाणात प्रवासी वर्गात रोष दिसुन येत आहे. तर आपल्या क्षेत्रातील जनतेला चांगल्या सोई, सुविधा, प्रवाशांची साधने , उपलब्ध न करुन देता निव्वळ राजकारण करत आहेत.

**सायंकाळच्यावेळी पारशिवनी शहराकरीता एसटी बस फेऱ्यात वाढ करा, प्रवाश्याची मागणी मनमानी कारभार करणाऱ्या एसटी महामंडळाच्या अधिकारावर कारवाईची मागणी**

नागपुर ते पारशिवनी अतिरिक्त एसटी बस फेऱ्या सायंकाळी ४ ते ८ वाजेच्या दरम्यान वाढवण्याची नितांत आवश्यकता असून नियमित असलेल्या नागपुर ते पारशिवनी बस फेऱ्या वेळेनुसार सुरु ठेवले गरजेचे आहे.

तर नियोजित एसटी बस रद्द करु नये, अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे. नागपुर पारशिवनी बस फेऱ्या विनाकारण रद्द करने, वेळेचे बंधन न पाळणे, एसटी बस परिचलणात अनीयमीतता करने असे प्रकार करणार्या अधिकारावर तात्काळ कारवाई करुन त्यांच्यावर मंत्री मोहदयानी बडतर्फी निलंबनाची कारवाई करण्याची मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

# महानगरासह ग्रामीण भागाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्यक्रम : पालकमंत्री बावनकुळे

- २०२८ पर्यंतचा जिल्ह्याचा समग्र विकासाचा आराखडा दृष्टीपथात
- कस्तुरचंद पार्कवर प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्ह्यात सर्वच क्षेत्रात विविध विकासकामे सुरू आहेत. २०२८ पर्यंतचा जिल्ह्याच्या समग्र विकासाचा आराखडा आपण दृष्टीपथात ठेवलेला आहे. महानगरासह ग्रामीण भागाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. याअनुषंगाने शासनाच्या प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जनतेचा सेवक या नात्याने आपली जबाबदारी पार पाडावी, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.



कस्तुरचंद पार्क मैदानावर आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमात ते बोलत होते. खासदार श्यामकुमार बर्वे, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यातील विकासकामांचा उल्लेख करताना पालकमंत्री श्री. बावनकुळे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सावनेर हे गाव आता सुरक्षा कवच असलेले गाव म्हणून नावारुपास आले आहे. सीसीटीव्हीच्या निगराणीतून मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविले जात आहे. नागपूर ग्रामीण पोलिसांनी सेव्ह लाईफ इंडियासोबत केलेल्या उपाययोजनांमुळे २०२५ मध्ये नागपूरच्या ग्रामीण भागात अपघात व मृत्यूंमध्ये घट होताना दिसत आहे. नागपूर शहर पोलीस आधुनिक तंत्रज्ञान आणि कायदेशीर कारवाईच्या माध्यमातून शहर सुरक्षित ठेवण्यासाठी कटिबद्ध आहेत. अमली पदार्थ नियंत्रणासाठी 'ऑपरेशन थंडर', सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर ओळखण्यासाठी 'गरुड दृष्टी' आदी उपक्रम राबविण्यात आले असल्याचे पालकमंत्री बावनकुळे पुढे म्हणाले.

नुकत्याच पार पडलेल्या दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाची नवी गाथा लिहिली आहे. महाराष्ट्रातील जनतेसाठी, शेतकरी, महिला, तरुणांसाठी, उद्योगासाठी जागतिक गुंतवणुक त्यांनी आणली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत वन ट्रीलियन करायची आहे. त्याची पायाभरणी होत आहे. आपली वाटचाल आता विकसित महाराष्ट्राच्या दिशेने सुरु आहे. नागपूर जिल्ह्याच्या विकासात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मेट्रो आणि परिवहनाच्या सुविधांवर लक्ष केंद्रीत केल्याने शहराचे रूप आंतरराष्ट्रीय होत असल्याचे ते यावेळी म्हणाले.





भारताच्या जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल २०२६ पासून सुरू होत आहे. ही देशातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना आहे. घरगुती जनगणनेसाठी मोबाईल ॲप आणि केंद्रीय पोर्टलचा होणार आहे. आपण केवळ प्रजासत्ताक दिन साजरा करत नाही आहोत, तर विकासाच्या एका सुवर्णकाळाचे साक्षीदार होत असल्याचे ते म्हणाले.

राज्यभर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान आपण हाती घेतले आहे. अनेक वर्षापासून शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाणंद रस्त्याचा प्रलंबित प्रश्न आता मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेमुळे मार्गी लागत आहे. सुमारे १ हजार २५० किलोमीटर रस्त्याला आपण जिल्हा नियोजन समिती निधी व मायनिंग अंतर्गत मंजूरी दिली आहे. या रस्त्यासाठी नागपूर जिल्ह्यात असलेल्या विविध थर्मल पॉवर स्टेशनच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या राखेवर प्रक्रिया करुन नवी मजबूती देण्याचा पथदर्शी प्रकल्प नागपूर जिल्ह्यात सुरु आहे.

नागपूर शहरातील पंधरा झोपडपट्टी मधील २ हजार २०५ झोपडपट्टीधारकांना आपण अलिकडेच भाडेपट्टे वितरीत केले आहे. ग्रामीण व तहसील भागात आजवर एकूण ३० हजारांपेक्षा जास्त एवढे पट्टेवाटप झाले आहे. मनपा अंतर्गत खाजगी व मनपा पातळीवरील सुमारे ६ हजार पट्टे वाटप झाले आहेत. भविष्यातील नागपूरचा विस्तार लक्षात घेऊन सुमारे १४८ किलोमीटर लांबीचा बाह्यवळण महामार्ग विस्तारीत झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर मनपाच्या विकासकामांचाही त्यांनी भाषणात उल्लेख केला. नागपूर मनपाची वाहतूक व्यवस्था, नवीन इलेक्ट्रीक बसच्या मुबलक उपलब्धतेमुळे आणि मेट्रोच्या सुविधेमुळे एक भक्कम दळणवळण व्यवस्था उपलब्ध झाली आहे. सुरळीत वाहतुकीसाठी पीएम ई-बस सेवा असणार आहे. मनपा अंतर्गत प्रगतीचा आलेख पाहिला तर शहराच्या प्रगतीचा विस्तार झाला आहे. अमरावती रोडवरील तुरागोंदी, बुटीबोरी जवळील शिरुर, भंडारा रोडवरीलपलसाड, आणि पारशिवनी जवळील इटगाव येथे नियोजीत ट्रान्सपोर्ट प्लाझातून औद्योगिक क्षेत्राच्या वाहतूक सुविधेला मिळणार गती मिळणार असल्याचे ते म्हणाले.

नवीन नागपूर अंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र उभे राहणार आहे. हिंगणा तालुक्यात नवीन नागपूर अंतर्गत इंटरनॅशनल बिजनेस अँण्ड फायनान्स सेंटर उभे राहणार आहे. शहराला वाणिज्य केंद्र म्हणून विकसीत करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे. जिल्ह्यातील गरजु महिलांना स्वयंरोजगारासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून नवसखी उद्योगिनी योजना आणण्यात आली आहे. जिल्ह्यातील विकासकामांचा ओघ पाहता २०२८ पर्यंतचा जिल्ह्याच्या समग्र विकासाचा आराखडा आपण दृष्टीपथात ठेवलेला असल्याचे ते पुढे म्हणाले.

जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आपल्या भाषणादरम्यान कौतुक केले. विविध योजना व उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

## दोन पालकमंत्री व दोन मंत्री असूनही बुलढाण्यात प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाला मंत्र्यांची गैरहजेरी

**दै. सिंहवाणी वृत्त, बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात आज प्रजासत्ताक दिनानिमित्य जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शासकीय ध्वजवंदन पार पडल. मात्र या सोहळ्याला जिल्ह्यातील एकही मंत्री उपस्थित न राहिल्याने आता जिल्हाभरात चर्चांना उधाण आल आहे. विशेष म्हणजे बुलढाणा जिल्ह्याला तब्बल दोन पालकमंत्री व दोन मंत्री लाभलेले असताना एकही मंत्री ध्वजावंदनासाठी हजर न राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव तसेच सहपालकमंत्री संजय सावकारे हे दोघेही या शासकीय कार्यक्रमाला अनुपस्थित होते तर राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे दोघे जिल्ह्यात उपस्थित असतानाही बुलढाण्यातील मुख्य ध्वजारोहण समारंभाला गैरहजर राहिले यामुळे जिल्ह्याचा सर्वात महत्वाचा राष्ट्रीय सोहळा असताना लोकप्रतिनिधींची ही अनुपस्थिती अनेक प्रश्न उपस्थित करत आहे.

मंत्री जिल्ह्यात असताना ध्वजारोहणाला का आले नाहीत? असा सवाल आता सामान्य नागरिकांकडून केला जात आहे. यामुळे जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, आगामी काळात यावर संबंधित मंत्र्यांकडून स्पष्टीकरण दिले जात का...? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देश रंगीला...रंगीला, देश मेरा रंगीला!







**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त अंबाझरी मार्गावरील बी. आर. एस. ए. मुंडले हायस्कूल येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील विविध शाळांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. एकापेक्षा एक सरस देशभक्तीपर गीते, नाटिका आणि समूह नृत्य अशा दमदार प्रस्तुतीने प्रजासत्ताक दिनाची सायंकाळ देशभक्तीमय झाली. नागरिकांची या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती होती.**

# क्राइम ब्रांच की बड़ी कार्रवाई, गांजा तस्करी गिरोह का किया भंडाफोड

## दो आरोपी सहित ३० लाख का माल जब्त

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

नागपुर के यशोधरा नगर पुलिस थाना अंतर्गत पुलिस ने पुष्पा फिल्म की तर्ज पर गांजा तस्करी के एक सनसनीखेज मामले का खुलासा हुआ है। क्राइम ब्रांच के सामाजिक सुरक्षा विभाग और एनडीपीएस पथक ने संयुक्त कार्रवाई करते हुए इस तस्करी रैकेट का पदार्फाश किया है। इस कार्रवाई में २ आरोपियों को गिरफ्तार कर उनके पास से करीब साढ़े ३० लाख रुपये के माल को जब्त किया गया है।



क्राइम ब्रांच की संयुक्त टीम ने गुप्त सूचना के आधार पर आज तड़के यशोधरा नगर पुलिस थाना अंतर्गत कोकण एग्रो मरीन इंडस्ट्रीज कारखाने के सामने, वांजरा लेआउट स्मॉल फैक्टरी एरिया में यह छापा मारा गया। इस दौरान पुलिस ने एक आयशर ट्रक से ४१ किलो ८४६ ग्राम गांजा बरामद किया। गांजे की कीमत करीब १० लाख ३४ हजार ८५० रुपये आंकी गई है। वहीं ट्रक, तीन मोबाइल फोन समेत कुल ३० लाख ५५ हजार ८५० रुपये का माल जब्त किया गया है।

जांच में सामने आया है कि गांजे की यह खेप ओडिशा के संबलपुर जिले से नागपुर लाई जा रही थी। तस्करों ने गांजा छुपाने के लिए ट्रक के केबिन के पीछे खास तौर पर गुप्त कंपार्टमेंट तैयार किया था, ताकि पुलिस की नजरों से बचा जा सके। इस मामले में पुलिस ने दो आरोपियों को गिरफ्तार किया है। गिरफ्तार आरोपियों में मोहम्मद शमशाद इम्तियाज अहमद, ट्रक चालक एवं मालिक, तथा शाहरुख खान इक्बाल खान, का समावेश है।

पुलिस ने आरोपियों के खिलाफ एनडीपीएस एक्ट की संबंधित धाराओं के तहत यशोधर नगर पुलिस थाने में मामला दर्ज किया है। आरोपियों ने पूछताछ में खुलासा किया कि वे इस माल को ईटाभट्टी निवासी सोनू खान को डिलीवर करने वाले थे हालांकि अभी तक पुलिस सोनू खान को गिरफ्तार नहीं कर पाई है।

जबकि ओडिशा के दो अन्य तस्करों की भी तलाश की जा रही है जिनके पास से इस माल को लाया गया था। अब पुलिस इस पूरे नेटवर्क की गहराई से जांच कर रही है और आने वाले दिनों में इस मामले में और गिरफ्तारियां होने की संभावना पुलिस व्यक्त कर रही है।

## गुरुकुल इंडियन ऑलिम्पियाड स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पब्लिक एज्युकेशन सोसायटी संचालित गुरुकुल इंडियन ऑलिम्पियाड स्कूल ऑफ स्कॉलर, पुणापूर पाडी, नागपूर येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.



या प्रसंगी सौ. आशाबाई मिलमिले यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. त्यानंतर राष्ट्रगीत,झेंडागीत व राज्य गीत,सादर करण्यात आले. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.जोत्सना मिलमिले, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीत, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संविधानाचे महत्त्व, देशाची एकता व अखंडता यावर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी देशाच्या प्रगतीसाठी व आदर्श नागरिक घडविण्याचा संकल्प करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

### थोडक्यात

## अस्तित्व फॉउंडेशन मे गणतंत्र दिवस



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अस्तित्व फाउंडेशन के मुख्य कार्यालय में २६ जनवरी को ७७ वा गणतंत्र दिवस बड़े ही उत्साह और गौरव के साथ मनाया गया। इस अवसर पर तिरंगा ध्वज फहराकर ध्वजवंदन कर राष्ट्र के प्रति सम्मान व्यक्त किया गया तथा सभी ने संविधान और देश की एकता, अखंडता एवं प्रगति के लिए सदैव तत्पर रहने का संकल्प लिया। इस कार्यक्रम में विशेषतः अशोक गोखले, गणेश धकाते, गणेश हेडाऊ, जयदेव हेडाऊ, होमेश पखालें, मोहन हेडाऊ, संजय हेडाऊ, रूपाली हेडाऊ, प्रीति हेडाऊ, कावेरी हेडाऊ, सुमित्रा हेडाऊ आदी कि उपस्थिती रही।

## जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित अधिकारी - कर्मचाऱ्यांनी भारतीय ध्वजास मानवंदना दिली. पोलीस विभागाच्या बँड पथकाने यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## जिल्हा न्यायालयात ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा न्यायालयात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रवीण उन्हाळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष रोशन बागडे, न्यायाधीश, वकील तसेच अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. प्रारंभी पोलीस विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस विभागाच्या बँड पथकाने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. यावेळी न्या. दिनेश सुराणा यांनी उपास्थितांना शुभेच्छा दिल्या.

## नेरला येथे दोन दिवसीय मंडईची सुरुवात आमदंगलने

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही नेरला येथील ग्रामपंचायत पटांगणात सार्वजनिक आखाडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे गणराज्य दिनानिमित्त आखाडा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात सोमवार( दि. २६ जानेवारी )ला करण्यात येणार आहे. मंगळवार २७ जानेवारीला जुनीवस्ती नेरला येथे क्रांतीज्योती कलंगी मंडळ खंडाळा (निलज) शाहीर सुरज ब्रह्माजी नवघरे विरुद्ध शाहीर राजहंस देवघरे यांच्या दुय्यम खडा तमाशा, नवीन वस्ती नेरला येथे पारडी वग येथील शाहीर निशान सुखदेवे विरुद्ध भागेमहारी येथील शाहीर ज्ञानेश्वर वाघमारे यांच्या राष्ट्रीय संगीत खडीगंमत कार्यक्रम ,रात्री नऊ वाजता नवीन वस्ती नेरला येथे वडसा येथील तीन अंकी नाटक विश्वासघात या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटक महसूल मंत्री तथा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार शामकुमार बर्वे, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री सुनील केदार, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, प्रमुख पाहुणे चंद्रपाल चौकसे, अमोल देशमुख, कैलास बरबटे, स्वप्निल श्रावणकर, खेमराज चाफले, नंदाताई लोहबरे, उदयसिंग यादव, देवेंद्र गोडबोले, दुधाराम सव्वालाखे, हर्षवर्धन निकोसे, किशोर गजभिये ,असलम शेख, डॉ. दिनेश बादोले,प्रमोद बरबटे, प्रज्ञा राहुल बावणे, लुमिनी महेश कलारे ,संकेत झाडे, रजत महादुले, लक्ष्मण उमाळे ,संतोष झामतानी, अतुल कोटांगले, नितेश वांगे, रमेश कारेमोरे, नरेंद्र बांधाटे, विजय हटवार, मदन बरबटे, नागेश्वरी मारुती कडू ,रोशन मेश्राम सह गावातील, परिसरातील ,तालुक्यातील, जिल्ह्यातील उद्योजक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून या दोन दिवसीय मंडई उत्सवाच्या लाभ घेण्याचे आव्हान सार्वजनिक आखाडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे अध्यक्ष पिंटू नाटकर, उपाध्यक्ष ज्ञानी रोहनकर ,सचिव अभिषेक चोपकर ,सदस्य प्रमोद कडू, शुब्बू कडू, प्रफुल लोणकर, सचिन कारेमोरे, सचिन तिवाडे, शुभम मोहर्ले, रोशन नाटकर, शुभम पडोळे, विकी पडोळे, रोहित भिवगडे, रोशन भिवगडे, मनोहर भिवगडे, अभिषेक दहेलकार व समस्त ग्रामवासी यांनी केले आहे.

## नाबालिक से छेड़खानी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुरः** नागपुर के पांचपावली इलाके से एक चौकाने वाली घटना सामने आई है, जहाँ एक नाबालिक लड़की के साथ बीच सड़क पर दरिंदगी की हद तक छेड़खानी की गई। हैरान कर देने वाली बात यह है कि आरोपी एक होमगार्ड जवान है। हालांकि इस मामले की जानकारी मिलने के तुरंत बाद पुलिस ने आरोपी को गिरफ्तार कर लिया है और आगे की जांच कर रही है। प्राप्त जानकारी के अनुसार यह घटना पांचपावली थाना क्षेत्र की है जहां ट्यूशन पढ़कर घर लौट रही महज १३ साल की, नवीं कक्षा की छात्रा के साथ बीच रास्ते में यह घटना हुई। घबराई हुई बच्ची किसी तरह घर पहुँची और परिवार को सारी बात बताई।